राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता



**गारगोटी येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयात व्याख्यानात बोलताना पी जी शेखर, बाजूस प्राचार्य डॉ जी एस म्हंगोरे, डॉ सागर पोवार,प्रा,अरुण गोडसे, प्रा शशिकांत चव्हाण आदी**

# शेअर बाजार, म्युच्युअल फंड गुंतवणूक सर्वात फायदेशीर- पी. जी. शेखर

**गारगोटी, ता.२१(प्रतिनिधी)–**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पारंपारीक गुंतवणूक पर्यायाऐवजी शेयर मार्केट, म्युच्युअल फंड या आधुनिक पर्यायाकडे वळावे. तसेच करिअर संधी म्हणून पहावे. असे मत पी जी शेखर यांनी व्यक्त केले.येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजीत कॅपीटल मार्केट आणि वित्तीय व्यवस्थापन या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सागर पोवार यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ जी एस म्हांगोरे होते.

पी. जी. शेखर यांनी भागभांडवल, शेअर्समधील चढ उतार, म्यूच्यूअल फंड, विविध कंपन्यांचे भाग बाजारातील स्थान, रूपयाचे अवमूल्यन इ. बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्र. प्राचार्य म्हांगोरे यांनी अध्यक्षीय भाषणात, वाणीज्य शाखेमध्ये शेयर मार्केट व म्युच्युअल फंड रूपाने चांगले करिअर उपलब्ध असल्याचे प्रतिपादन केले.कार्यक्रमास उपप्राचार्य ए. जे. गोडसे, प्रा. एस. एस. चव्हाण व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येंने उपस्थित होते. आभार एस. डी. मोरे यांनी मानले.